# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

**(वित्त व लेखा विभाग)**

महात्मा ज्योतीबा फुले, शैक्षणीक परिसर, अमरावती रोड, नागपूर– ४४००३३. फोन नं. ०७१२–२०५३५६५


पत्र. क्र. लेखा/ ८३२ दिनांक २६/६/२०१८

## अधिसुचना

सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ८/५/२०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेतील बाब क्र. ७१ अन्वये शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क न आकारण्याबाबतच्या नियमावलीस मंजुरी प्रदान करण्यात आली असुन सदर नियमावली सत्र २०१८–१९ पासुन लागु करण्यात येत आहे.

### शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क न आकारण्यासंबंधीची नियमावली.

व्यवस्थापन परीषदेने दिनांक १० ऑगष्ट २०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेत शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाद्वारे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क न आकारण्याबाबत मंजुरी दिली असुन सदर शुल्क माफीचा प्रस्ताव सुरळीतपणे कार्यरत राहण्याच्या दृष्टीने पुढील नियमावली तयार करण्यात येते आहे.

१) या नियमावलीस ''शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाद्वारे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क न आकारण्यासंबंधीची नियमावली–२०१८'' असे संबोधण्यात येईल

२) शिक्षण, व परिक्षा शुल्कात सवलत देण्याबाबतची व्यवस्थापन समिती.

शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुला मुलींकरीता व विधवा पत्नीला शिक्षण, परीक्षा शुल्क न आकारण्याबाबतची व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे राहील. याबाबतचा धोरणात्मक किंवा इतर कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीला राहील व समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | प्र–कुलगुरू | (अध्यक्ष) |
| २) | कुलगुरूंनी नामीत केलेल्या विद्यापीठाचे एक विभाग प्रमुख | (सदस्य) |
| ३) | कुलगुरूंनी नामीत केलेल्या संलग्नित महाविद्यालयाचे एक प्राचार्य | (सदस्य) |
| ४) | विद्यापीठ विद्यार्थी परीषदेचा अध्यक्ष व सचिव | (सदस्य) |
| ५) | संचालक, विद्यार्थी विकास | (सदस्य–सचिव) |

३) ही नियमावली व्यवस्थापन परीषदेच्या दिनांक ८ मे २०१८ बाब क्र. ७१ अन्वये, मान्यता दिलेल्या दिनांका पासुन अस्तित्वात येईल.

४) उद्दीष्टये :

शहीद (लष्करी,निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुलामुलींना व विधवा पत्नी यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणे सुलभ होण्याकरीता.

५) आर्थीक तरतुद :

शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुला/मुलींच्या व विधवा पत्नीला शिक्षण व परिक्षा शुल्काची रक्कम एकत्रीतरित्या विद्यार्थी कल्याण निधीतुन साधारण निधी मध्ये वळती करण्यात येईल. दरवर्षी अर्थसंकल्पात विद्यार्थी कल्याण निधी अंतर्गत त्यानुसार तरतुद करण्यात येईल.

६) शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांच्या मुलामुलींना व विधवा पत्नीला शिक्षण व परिक्षा शुल्क न आकारण्याबाबतचे नियम व कार्यपध्दती.

(अ) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग व संचालीत महाविद्यालये.

१. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभाग व संचालीत महाविद्यालयातील (अनुदानीत व विनाअनुदानीत) अभ्यासक्रमासाठी (सेल्फ फायनान्स व ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय नियंत्रीत प्राधीकरणाद्वारे नियंत्रीत केले जातात असे अभ्यासक्रम वगळून) शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांचे मुले,मुली व विधवा पत्नी शिक्षण घेऊ इच्छित असतील तर अशा प्रवेशित विद्यार्थ्यांकडन विद्यापीठाकडून कोणतेही शिक्षण व परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही.

२. संबधीत विद्यार्थ्यांनी संचालीत महाविद्यालयात अथवा विद्यापीठात प्रवेश घेण्यापुर्वी सवलतीकरीता आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे, विहीत अर्जासहीत संचालक, विद्यार्थी विकास यांना सादर करावे. संचालकांनी आपले स्तरावर सर्व कागदपत्रांची तपासणी करून सवलतपात्र विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करावे

३. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात तसेच संचालीत महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी शिक्षण व परिक्षा शुल्कात सवलत प्राप्त करण्याकरीता विहीत नमुण्यात अर्ज दिनांक १ जुन ते ३० जुन या कालावधीत संचालक विद्यार्थी विकास यांना सादर करतील.

४. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग तथा संचालीत महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबधीत शैक्षणिक विभागात तथा संचालीत महाविद्यालयात प्रवेश घेतांना संचालक, विद्यार्थी विकास यांनी दिलेले शिक्षण व परिक्षा शुल्कात सवलत मिळाल्याबाबतचे प्रमाणपत्राची मुळ प्रत सादर करावी.

(ब) विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालये.

१. शहीद (लष्करी, निमलष्करी व सर्व पोलीस दलातील) जवानांचे मुले,मुली व विधवा पत्नी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात अनुदानीत व विनाअनुदानीत अभ्यासक्रमासाठी (सेल्फ फायनान्स व ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय नियंत्रीत प्राधीकरणाद्वारे नियंत्रीत केले जातात असे अभ्यासक्रम वगळून) प्रवेश घेऊ इच्छित असतील तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही.

२. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्कात सवलत मिळण्याकरीता विहीत नमुन्यात अर्ज, परीक्षा अर्ज स्विकारण्याचा अंतिम मुदतीच्या १५ दिवस आधी संचालक विद्यार्थी विकास यांचेकडे सादर करावा.

७) सदर योजने अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना केवळ नियीमत परीक्षा शुल्कात सवलत मिळेल विलंब शुल्कात कुठलीही सवलत मिळणार नाही.

८) संबंधीत विद्यार्थ्यांनी परिक्षा अर्ज सादर करतेवेळी परीक्षा शुल्का ऐवजी परीक्षा शुल्क सवलतीबाबत चे प्रमाणपत्राची मुळ प्रत सादर करावी विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभाग, संचालीत महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज जमा करतांना ज्या विद्यार्थ्यांना सवलत मिळाली आहे त्या विद्यार्थ्यांचे संचालक, विद्यार्थी विकास यांनी दिलेले प्रमाणपत्राची मुळ प्रत परिक्षा विभागात सादर करावीत.

९) ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क यात सवलत दिलेली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांच्या एकत्रीत शुल्काची रक्कम विद्यार्थी कल्याण निधीतून साधारण निधीमध्ये वळती करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, विद्यार्थी विकास हे वित्त व लेखा अधिकारी यांना सादर करतील. तसेच याबाबत अर्थसंकल्पात